# कोंकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, मुंबई

## (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा विभागीय घटक)

म्हाडा MHADA

म्हाड अधिनियम १९७६, नियम १९८१ व विनियम १९८२ अन्वये त्यात वेळोवेळी झालेल्या सुधारणांच्या अधिन राहून नगररचना विभागाकडील अधिसूचना दि. ०८/११/२०१३ व त्यात वेळोवेळी झालेल्या सुधारणांनुसार प्रधानमंत्री आवास योजना, सर्व समावेशक गृहनिर्माण योजना व म्हाडाच्या गृहनिर्माण योजने अंतर्गत सदनिकांच्या विक्रीसाठी म्हाडाचे संकेतस्थळ https://lottery.mhada.gov.in वरून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

# ऑनलाईन सोडत ऑगस्ट, २०२१, वेळापत्रक

| | | | |
|---|---|---|---|
| ऑनलाईन अर्ज नोंदणी सुरूवात दिनांक: | २४/०८/२०२१ दुपारी १२.०० वा. पासून | ऑनलाईन अर्जाची सुरूवात दिनांक: | २४/०८/२०२१ दुपारी ०३.०० वा. पासून |
| ऑनलाईन अर्जासाठी नोंदणीचा शेवटचा दिनांक: | २२/०९/२०२१ रात्री ११.५९ वा. पर्यंत | ऑनलाईन अर्ज सादर करणे शेवटचा दिनांक: | २३/०९/२०२१ रात्री ११.५९ वा.पर्यंत |
| ऑनलाईन बँकेत RTGS/NEFT द्वारे अनामत रक्कम भरणा करण्यासाठी अंतिम दिनांक: | २४/०९/२०२१ रात्री ११.५९ वा. पर्यंत | सोडतीचा दिनांक: | १४/१०/२०२१ सकाळी १०.०० वा.पासून पुढे |
| ऑनलाईन सोडतीचे स्थळ: | डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह, हिरानंदानी मेडोस जवळ, मानपाडा, ठाणे (प) | अनामत रक्कम व शुल्क भरणा: | Account Name - Konkan Board MHADA Lottery 2021<br>Bank Name - Bank of Maharashtra<br>IFSC Code - MAHB0000164 - MICR 400014043 |

| योजनेचा संकेत क्रमांक | योजनेचे नाव | उत्पन्न गट | सदनिकेची अंदाजित किंमत (₹) | सदनिकेचे चटई क्षेत्रफळ (चौ. मीटर) | एकूण सदनिका | आरक्षण गटनिहाय उपलब्ध सदनिका | | | | | | | | | | | | | | | महारेरा नोंदणी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | अनुसूचित जाती आणि नवबौद्ध (SC) | अनुसूचित जमाती (ST) | भटक्या जमाती (NT) | विमुक्त जमाती (DT) | पत्रकार (JR) | स्वातंत्र्य सैनिक (FF) | अंध व शारिरीक दृष्ट्या अपंग (PH) | संरक्षण दलातील किंवा सीमा सुरक्षा दलातील लढाईत मृत झालेल्या सैनिकांचे कुटुंबिय अथवा जखमी होऊन अपंग झालेले कर्मचारी (DF) | माजी सैनिक व त्यांच्या वर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती (EX) | महाराष्ट्रा-तील मतदार संघाचे प्रति-निधीत्व करणारे संसदेचे विधान सभेचे व विधान परिषदेचे आजी-माजी सदस्य (MP/ MLA/ MLC) | म्हाडा कर्मचारी (ज्यांची ५ वर्ष सेवा पूर्ण झाली आहे) (ME) | राज्य शासकीय कर्मचारी आणि संबंधित मंडळ, महामंडळे इ. चे अधिकारी/ कर्मचारी यात यापूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-ऱ्यांचा समावेश आहे) (SG) | शासकीय निवास स्थानामध्ये राहणारे आणि जे तीन वर्षांत सेवानिवृत्त होणार आहेत किंवा अगोदरच सेवा निवृत्त झाले असतील असे केंद्र सरकारचे कर्मचारी (CG) | चित्रपट, दूरदर्शन, नाटक, तमाशा, आकाशवाणी या माध्यमातील कलाकार, परफॉर्मींग आर्टसशी संबंधित कलाकार या मध्ये (चित्रकार, शिल्पकार, गवई, (गायन व वाद्य) नर्तक, कारागीर, कवी, कव्वाल व नकलाकार (AR) | सर्व-साधारण जनता | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| **(अ) प्रधानमंत्री आवास योजना (PMAY)**<br>**(प्रधानमंत्री आवास योजनेतील सदनिकांची किंमत केंद्र सरकार व राज्य शासनाने एकूण अनुदान ₹ २,५०,०००/- असे प्रति सदनिका किंमत वजा करुन दर्शविण्यात आली आहे).** | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २७०-अ | शिरढोण, कल्याण | अत्यल्प | १४,९६,९३०/- | २९.९ | ६२४ | ० | १०० | ० | २७ | ४६ | ४८ | ४३ | ३६ | ९० | ० | ३८ | ८५ | ३८ | ३५ | ३८ | P५१७०००१६८२० |
| २७१-अ | खोणी, कल्याण | अत्यल्प | १७,६८,६५८/- | २९.९ | ५८६ | ० | ९१ | ० | १२ | ४५ | ५१ | २७ | ३७ | ९५ | ० | ४० | ७४ | ३९ | ३५ | ४० | P५१७०००१६८३१ |
| २७९ | सर्व्हे क्र. १६२, खोणी, तालुका कल्याण, जिल्हा ठाणे, मजला ८ ते १५, (पॉकेट १,२,३,४) | अत्यल्प | १७,६८,६५८/- | २९.९ | २०१६ | २२२ | १२१ | ३० | ३० | ५१ | ५१ | ६१ | ४० | १०१ | ४० | ४० | १०१ | ४० | ४० | १०४८ | P५१७०००१६८३१ |
| २८० | सर्व्हे क्र. १३, भंडार्ली, ता जि ठाणे | अत्यल्प | १७,३४,२७१/- | २८.९ | १७६९ | १९५ | १०६ | २७ | २६ | ४४ | ४४ | ५३ | ३५ | ८९ | ३५ | ३६ | ८९ | ३५ | ३५ | ९२० | P५१७०००२४४०३ |
| २८१ | गोठेघर, ठाणे | अत्यल्प | १७,१५,१६४/- | २८.९ | ११८५ | १३० | ७१ | १८ | १८ | २९ | २९ | ३६ | २४ | ५९ | २४ | २४ | ५९ | २४ | २४ | ६१६ | P ५१७०००२९५३४ |
| | | | | अ | ६१८० | ५४७ | ४८९ | ७५ | ११३ | २१५ | २२३ | २२० | १७२ | ४३४ | ९९ | १७८ | ४०८ | १७६ | १६९ | २६६२ | |
| **(ब) २०% सर्व समावेशक गृहनिर्माण योजना** | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २८२ | चंदनसर, ता. वसई | अत्यल्प | १०,०१,१००/- ते १३,९७,२००/- | १९.६२ ते २७.३९ | ८ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ४ | P९९००००७२५५ |
| २८३ | कासारवडवली, ठाणे | अल्प | १७,००,६९१/- ते १८,८४,८४१/- | ३६.२४ ते ४७.८८ | १६ | २ | १ | ० | ० | १ | १ | १ | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ८ | P५१७००००९४० |
| २८४ | सर्व्हे क्र. २१/१२, २१/१३, २१/१४, २१/१६/३, २१/१९ व २१/२१, मौजे वडवली, जि. ठाणे | अल्प | १५,०४,६६४/- | ३५.०८ | २० | २ | १ | १ | ० | १ | १ | १ | ० | १ | ० | १ | १ | ० | ० | १० | P५१९०००१०००४ |
| २८५ | स.क्र.२०/१, २०/२/ब/१ आणि २३/४ वडवली, ठाणे | अल्प | १९,५०,४००/- | ३६.८७ | ४० | ४ | २ | १ | १ | १ | १ | १ | १ | २ | १ | १ | २ | १ | १ | २० | P५१७०००००६१८ |
| २८६ | नविन सर्व्हे क्र. ४५, वडवली, मोघरपाडा, ठाणे | अत्यल्प | ११,८६,४००/- ते १३,५८,६००/- | २५.७५ ते २९.४९ | ७५ | ८ | ५ | १ | १ | २ | २ | २ | १ | ४ | १ | २ | ४ | १ | २ | ३९ | P५१७०००००९१२ |
| २८७ | नविन सर्व्हे क्र. ४५, वडवली, मोघरपाडा, ठाणे | अल्प | १९,८६,७००/- | ४३.१२ | ५६ | ६ | ३ | १ | १ | २ | १ | २ | १ | ३ | १ | १ | ३ | १ | १ | २९ | P५१७०००००९१२ |
| २८८ | स.क्र. ५९/2A, ५९/2B, ६१/३ मोघरपाडा, ठाणे (प) | अल्प | ११,४५,६२८/- | ३२.५३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | लागू नाही |
| २८९ | स.क्र. ५९/2A, ५९/2B, ६१/३ मोघरपाडा, ठाणे (प) | अत्यल्प | ९,९८,६८६/- | २८.४८ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | लागू नाही |
| २९० | सी टी एस १८५, पारसिक नगर ता. जि. ठाणे | अल्प | २१,५६,०००/- | ३९.८३ | १६ | २ | १ | ० | ० | १ | १ | १ | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ८ | P५१७००००००९५ |
| २९१ | पारसिक नगर, ठाणे | अल्प | १५,८३,१००/- ते २०,४९,४००/- | ३८.१७ ते ४९.४२ | १९ | २ | १ | १ | ० | १ | १ | १ | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | १० | P५१७००००३१७७ |
| २९२ | सर्व्हे क्र.१३२/१,१३२/२अ, २०८/९ मौजे डावले, ठाणे | अल्प | १७,७६,५००/- | ४४.०३ | २८ | ३ | २ | १ | ० | १ | १ | १ | ० | १ | ० | १ | १ | १ | ० | १५ | P५१७००००८१६८ |
| २९३ | सेक्टर ६,सर्व्हे क्र.२५०/१, २सी, २डी, ४ व २५१/१ कावेसर, आनंद नगर, ठाणे | अत्यल्प | ११,०४,८४६/- | २८.७८ | २३ | ३ | १ | ० | १ | १ | १ | १ | ० | १ | ० | १ | १ | ० | ० | १२ | लागू नाही |
| २९४ | सर्व्हे क्र. १६९/१, १७०/१, कावेसर ता. जि. ठाणे | अल्प | १६,१६,४८३/- ते १६,१७,८१८/- | ४२.५३ ते ४२.५८ | १७ | २ | १ | ० | ० | १ | १ | १ | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ९ | P ५१७००००१२८४ |
| २९५ | सर्व्हे क्र. ७/१७ A, कावेसर, ठाणे | अल्प | १६,४४,४००/- ते १६,५४,८००/- | ३८.९१ ते ३९.१६ | २४ | ३ | १ | १ | ० | १ | १ | १ | ० | १ | ० | १ | १ | १ | ० | १२ | P ५१७०००२७०८१ |
| २९६ | सर्व्हे क्र. ७६/१ कावेसर, ठाणे | अल्प | १७,९८,०००/- ते २०,०१,५००/- | ३७.१६ ते ४१.२१ | ९९ | ११ | ६ | २ | १ | २ | २ | ३ | २ | ५ | २ | २ | ५ | २ | २ | ५२ | P५१७००००५६५३ |
| २९७ | सर्व्हे क्र. १८३/१५- १८३/२९ बाळकुंभ, ठाणे | अल्प | १२,२७,६००/- | ३०.६१ | २१ | २ | १ | १ | ० | १ | १ | १ | ० | १ | ० | १ | १ | ० | ० | ११ | P५१७०००१९५१९ |
| २९८ | भाईंदरपाडा, ठाणे | अल्प | २०,४९,४००/- ते २३,३८,४००/- | ३५.५२ ते ४०.५० | २४ | ३ | १ | ० | १ | १ | १ | १ | १ | १ | ० | १ | १ | ० | ० | १२ | P५१७०००१५९५५ |
| २९९ | आगासन, ठाणे | अल्प | १९,८०,६००/- | ४०.४७ | ४७ | ५ | ३ | ० | १ | १ | १ | २ | १ | २ | १ | १ | २ | १ | १ | २५ | P५१७००००८८५ |
| ३०० | सर्व्हे क्र. ७३,५१२/१, ६१२, टिटवाळा ता. कल्याण | अल्प | १२,७२,६००/- | ३६.६ | २४ | ३ | २ | ० | १ | १ | १ | १ | १ | १ | ० | ० | १ | ० | ० | १२ | P५१७०००२४२२८ |
| ३०१ | सर्व्हे क्र. ७३,५१२/१, ६१२, टिटवाळा ता. कल्याण | अल्प | १२,८७,६००/- | ३७.०४ | १२ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ० | ० | १ | ० | १ | ६ | P५१७०००२४२२८ |
| ३०२ | सर्व्हे क्र. ७३,५१२/१, ६१२, टिटवाळा ता. कल्याण | मध्यम | १९,०१,९००/- | ५४.९६ | ६ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ३ | P५१७०००२४२२८ |
| ३०३ | सर्व्हे क्र. १२०/४अ,११८/३, टिटवाळा, ता. कल्याण | अल्प | १३,२१,०००/- | ३३.१३ | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | P५१७०००१७०६७ |
| ३०४ | सर्व्हे क्र. १२०/४अ,११८/३, टिटवाळा, ता. कल्याण | अल्प | १३,१८,५००/- | ३३.०६ | १२ | १ | १ | ० | ० | १ | ० | १ | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ६ | P५१७०००१७०६७ |
| ३०५ | सर्व्हे क्र. १२०/४अ,११८/३, टिटवाळा, ता. कल्याण | अल्प | १३,२८,३००/- | ३३.२८ | १२ | १ | १ | ० | ० | १ | ० | १ | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ६ | P५१७०००१७०६७ |
| ३०६ | प्लॉट नं. ७ सेक्टर ११, घणसोली, नवी मुंबई | अल्प | २०,७०,४००/- | ४१.९३ | ४० | ४ | २ | १ | १ | १ | १ | १ | १ | २ | १ | १ | २ | १ | १ | २० | P५१७०००१२३६५ |
| ३०७ | प्लॉट नं. २४ सेक्टर, ८ घणसोली, नवी मुंबई | अल्प | २०,४३,६००/- | ४३.८७ | १२ | १ | १ | ० | ० | १ | ० | १ | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ६ | P५१७००००००७४ |
| ३०८ | प्लॉट नं. २४ सेक्टर, ८ घणसोली, नवी मुंबई | अल्प | २०,३१,२००/- | ४३.५७ | ६ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ३ | P५१७००००००७४ |
| ३०९ | प्लॉट नं. २४ सेक्टर, ८ घणसोली, नवी मुंबई | अल्प | २०,३९,८००/- | ४३.७९ | १२ | १ | १ | ० | ० | १ | ० | १ | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ६ | P ५१७००००००७४ |
| ३१० | प्लॉट नं. २६ सेक्टर ८, घणसोली, नवी मुंबई | अल्प | २०,५५,२००/- | ४५.१४ | ९ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ५ | P५१७०००११५७२ |
| ३११ | प्लॉट नं. २६ सेक्टर ८, घणसोली, नवी मुंबई | अल्प | १५,८१,६००/- | ३४.७८ | ९ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ५ | P५१७०००११५७२ |
| ३१२ | प्लॉट नं. २६ सेक्टर ८, घणसोली, नवी मुंबई | अल्प | १५,४०,६००/- | ३३.८८ | ६ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ३ | P५१७०००११५७२ |
| ३१३ | प्लॉट नं. २६ सेक्टर ८, घणसोली, नवी मुंबई | अल्प | २०,३०,०००/- | ४४.६३५ | ९ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ५ | P५१७०००११५७२ |
| ३१४ | सर्व्हे क्र. ४७/९, वालिव, ता. वसई, जि. पालघर | अल्प | १२,६६,८००/- ते १३,६२,०००/- | ३१.९३ ते ३४.३१ | २८ | ३ | २ | १ | ० | १ | १ | १ | ० | १ | ० | १ | १ | १ | ० | १५ | P९९०००२०१०१ |
| ३१५ | नविन स. क्र. ३५, हिस्सा क्र. १/४, वालिव, ता. वसई जि. पालघर | अत्यल्प | १२,५६,२७०/- ते १३,६२,५५७/- | २६.५४ ते २९.२२ | १५ | २ | १ | ० | ० | १ | ० | १ | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ८ | P ९९००००१९७५ |
| ३१६ | वालिव, वसई | अत्यल्प | १०,४०,०००/- | २२.८१ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | P९९०००१७९०८ |
| ३१७ | वालिव, वसई | अल्प | १४,०१,९००/- ते १९,२६,०००/- | ३०.९८ ते ४२.२८ | ४० | ४ | २ | १ | १ | १ | १ | १ | १ | २ | १ | १ | २ | १ | १ | २० | P९९०००१७९०८ |
| ३१८ | कोपरी, वसई जि. पालघर | अत्यल्प | ८,१६,४००/- ते ८,८१,५००/- | २१.४४ ते २३.१५ | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | P९९०००१२१३३ |
| ३१९ | कोपरी, वसई जि. पालघर | अल्प | ११,९७,१००/- ते १७,७४,७००/- | ३१.४४ ते ४६.६१ | २० | २ | १ | १ | ० | १ | १ | १ | ० | १ | ० | १ | १ | ० | ० | १० | P९९०००१२१३३ |
| | | | | ब | ८१२ | ६३ | ३३ | १० | ८ | १९ | १८ | २२ | ८ | २९ | ६ | १३ | २९ | ८ | ८ | २९५ | |

पुढील पानावर चालू...

Sai Advertisers : (H) 50 cms. x (W) 33 cms.

... मागील पानावरून पुढे

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **(क) कोंकण म्हाडा गृहनिर्माण योजना** | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ११७ - क | मिरारोड, ठाणे | अत्यल्प | २२,७८,५९६/- | २१ | ११ | २ | १ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | ८ | लागू नाही |
| ११८ - क | मिरारोड, ठाणे | अत्यल्प | २२,७८,५९६/- | २१ | ४ | १ | १ | १ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | १ | लागू नाही |
| २५६ - ब | विरार, बोळींज | अल्प | २३,२८,५६६/- | ३0.६८ | ८२ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | ३ | 0 | ६ | २0 | 0 | ३ | 0 | 0 | 0 | ५0 | लागू नाही |
| २६३ - ब | विरार, बोळींज | अल्प | २३,२८,५६६/- | ३0.६८ | २0९ | 0 | २३ | 0 | 0 | ५ | ८ | 0 | २ | १९ | 0 | 0 | 0 | १७ | १४ | १२१ | लागू नाही |
| २६४ - ब | विरार, बोळींज | मध्यम | ४१,८१,८३४/- | ६0.७३ | ३६ | 0 | १९ | 0 | १ | 0 | १ | १ | १ | ४ | 0 | 0 | 0 | 0 | १ | ८ | लागू नाही |
| २६७ - अ | वेंगुर्ला, सिंधुदुर्ग | मध्यम | २५,७४,३८७/- | ४८.५१ | १ | 0 | १ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | P५१८0000२३२३ |
| २६८- अ | वेंगुर्ला, सिंधुदुर्ग | मध्यम | २३,८८,३५६/- | ४५ | १ | 0 | १ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | P५१८0000२३२३ |
| २६९- अ | सर्व्हे क्र. ४९१, वेंगुर्ला, सिंधुदुर्ग | उच्च | ३९,४६,८८६/- | ७३.४५ | १ | 0 | १ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | P५१८0000२३२३ |
| २७४- अ | विरार, बोळींज | अल्प | २५,७९,३५0/- ते २६,८७,८६७/- | ४0.९४ ते ४२.११ | ११७७ | 0 | २0८ | 0 | ४६ | १0 | 0 | ५६ | ८ | ३0 | १ | १ | ८४ | ४३ | २0 | ६७0 | लागू नाही |
| २७८- अ | विरार, बोळींज | अल्प | २५,९४,0५६/- ते २६,८७,८६७/- | ४0.६४ ते ४२.११ | १८६ | २0 | ११ | ३ | ३ | ५ | ५ | ६ | ४ | ९ | ३ | ४ | ९ | ४ | ४ | ९६ | लागू नाही |
| ३२0 | सर्व्हे क्र. १३, भंडार्ली, ठाणे | अल्प | ३२,३९,२0४/- | ४७.६५ | ८८ | १0 | ५ | २ | १ | २ | २ | ३ | २ | ४ | २ | २ | ४ | २ | २ | ४५ | P ५१७000२४४0३ |
| ३२१ | सर्व्हे क्र. २१६pt, २२१pt, २२२pt, मिरा रोड, ठाणे (२-बीएचके- बिल्डिंग-ए) | मध्यम | ५६,४0,१७४/- | ७३.६४ | ७७ | ८ | ५ | १ | १ | २ | २ | २ | २ | ४ | १ | २ | ४ | २ | १ | ४0 | P ५१८00002१५२ |
| ३२२ | सर्व्हे क्र. २१६pt, २२१pt, २२२pt, मिरा रोड, ठाणे (२-बीएचके- बिल्डिंग-बी) | मध्यम | ५४,९४,२८८/- | ६८.४२ | ८२ | ९ | ५ | १ | १ | २ | २ | २ | २ | ४ | २ | २ | ४ | २ | २ | ४२ | P५१८00002१५२ |
| ३२३ | सर्व्हे क्र. २१६pt, २२१pt, २२२pt, मिरा रोड, ठाणे (१-बीएचके- बिल्डिंग-ए) | मध्यम | ४४,८१,५८४/- | ५८.५१ | ३७ | ४ | २ | १ | 0 | १ | १ | १ | १ | २ | 0 | १ | २ | १ | १ | १९ | P५१८00002१५२ |
| | | | | क | १९९२ | ३३७ | २९२ | ६२ | ८0 | ५१ | ९५ | ९९ | १२४ | १0५ | २४ | १२२ | १७८ | ११६ | ११४५ | ११00 | |
| | | | एकुण (अ+ब+क) | | ८९८४ | ९४७ | ८१४ | १४७ | २0१ | २८५ | ३३६ | ३४१ | ३0४ | ५६८ | १२९ | ३१३ | ६१५ | ३00 | १३२२ | ४0५७ | |

## नोंदणीसाठी व अर्ज भरण्यासाठी सर्वसाधारण सूचना (अ) (ब) (क) साठी

- पॅन कार्ड • आधार कार्ड • बँकेचा रद्द केलेला चेक अथवा पासबुकचे पहिले पान • पासपोर्ट साईज फोटो (५0 के.बी. jpg पर्यंत) • मोबाईल क्र. व ईमेल आय.डी.
- राखीव गटाकरिता पात्रता सिद्ध करणारे पुरावे (अधिक माहितीसाठी संकेत स्थळावरील माहिती पहावी).
- अर्जदार किंवा त्याची पत्नी/पती किंवा अज्ञान मुले यांच्या नावे मालकी तत्त्वावर व इतर हक्काद्वारे संपादित केलेले निवासी घर अथवा निवासी भूखंड अर्ज करित असलेल्या योजनेच्या ग्रा.पं./न. पा./मनपा हद्दित नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र.
- यापूर्वी शासकीय योजनेमध्ये राज्यात कुठेही घर किंवा भूखंडाचा लाभ घेतलेला नसावा. **(शासनाचे दि. ११/0९/२0१९ च्या परिपत्रकानुसार).**
- अर्ज सादर करावयाच्या दिवशी अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.

| उत्पन्न गट | कौटुंबिक मासिक उत्पन्न मर्यादा ₹ | अनामत रक्कम ₹ | अर्जाची किंमत (विना परतावा) रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| अत्यल्प (EWS) | २५,000/- पर्यंत. | ५,000/- | ५६0/- |
| अल्प (LIG) | २५,00१/- ते ५0,000/- | १0,000/- | ५६0/- |
| मध्यम (MIG) | ५0,00१/- ते ७५,000/- | १५,000/- | ५६0/- |
| उच्च (HIG) | ७५,00१/- पेक्षा अधिक | २0,000/- | ५६0/- |

- अर्जदाराचे सरासरी मासिक कौटुंबिक उत्पन्न (पती + पत्नी यांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न) गट निहाय आवश्यक राहील. वार्षिक उत्पन्न दर्शविण्यासाठी कालावधी 0१/0४/२0२0 ते ३१/0३/२0२१ हा राहील. (कृपया उत्पन्नाबाबत अधिक स्पष्टता येण्यासाठी माहिती पुस्तिका पाहावी) उत्पन्न या संज्ञेत (पगारदारास) पगारातील मूळ वेतन, महागाई भत्ता, शहर भत्ता, बोनस आदि तत्सम भत्ते यांचा समावेश राहील तथापि घरभाडे भत्ता, प्रवास भत्ता, धुलाई भत्ता, अतिकालीक भत्ता, किट भत्ता, वाहन भत्ता, इत्यादि भत्ते व यासारखे भत्ते प्रतिपूर्तीसाठी (Reimbursable Allowance) देण्यात येतात त्यांचा समावेश असणार नाही. या करिता ज्या संस्थेत/शासकीय कार्यालयाने विहित नमुन्यात मुद्रांकित पत्रावर प्रमाणित करणे आवश्यक राहील व आयकर अदा केल्याबाबत चलनाची प्रत व इतर कागदपत्र सादर करणे अनिवार्य आहे.
- अर्जदार महाराष्ट्रातील अधिवासी/मागील २0 वर्षामधील १५ वर्षांचा रहिवासी असावा. (केंद्र शासन कर्मचारी प्रवर्ग आरक्षण वगळून).
- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती व विमुक्त जातीच्या प्रवर्गातील लाभार्थ्यांना पात्रता सिद्ध करणेसाठी जात प्रमाणपत्र, जातवैधता पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
- सोडत प्रक्रियेमधील सर्व संपर्क, ईमेल, एसएमएस व संकेत स्थळावर अपडेट करण्यात येईल. लेखी पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.
- अनामत रक्कम व शुल्क भरणेसाठी तपशिल-बँक ऑफ महाराष्ट्र, **Konkan Board MHADA Lottery 2021** या नावे **IFSC Code-MAHB0000164, MICR 400014043.**
- अयशस्वी अर्जदार व प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांना भरणा केलेल्या अनामत रक्कमेचा परतावा अर्जदारांनी अर्ज करताना नमूद केलेल्या बँक खात्यावर करण्यात येणार असल्यामुळे बँक खाते क्रमांक IFSC/MICR कोड काळजीपूर्वक व अचूक नमूद करावा. तसे न केल्यास परताव्यासंबंधी कोंकण मंडळ जबाबदार राहणार नाही.
- नियोजित प्रकल्पातील योजनांचे चटई क्षेत्रफळ, विक्री किंमत व सदनिकांची संख्या अंदाजित असून त्यामध्ये फेरबदल संभवनीय आहे.
- यशस्वी अर्जदार पात्र ठरल्यास अशा लाभार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार आवश्यक मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, सेवा शुल्क व जी.एस.टी. इत्यादी अदा करावा लागेल.
- **म्हाडाने/कोंकण मंडळाने कोणत्याही प्रकारच्या प्रतिनिधी/सल्ला देणारा वा प्रॉपर्टी एजंट म्हणून कोणाचीही नेमणूक केलेली नाही तसेच संगणकीय सोडतीत कोणत्याही प्रकारे मानवी हस्तक्षेप होऊ शकत नाही. याकरिता अर्जदारांना सूचित करण्यात येते की, अशा प्रकारच्या कोणत्याही प्रलोभनाला/ भूलथापांना बळी पडू नये.**
- जाहिरात व सोडतीच्या अनुषंगाने काही नवीन सूचना असल्यास **https://lottery.mhada.gov.in** या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.
- अनामत रक्कम परताव्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.
- अर्जदारास एका संकेतातील एकाच आरक्षण गटामध्ये एकापेक्षा जास्त अर्ज करता येणार नाहीत, असे आढळल्यास असे अर्ज सोडतीपूर्वी रद्द केले जातील.
- अर्जदारास सोडतीपूर्वी अनामत रक्कम भरून केलेला अर्ज कोणत्याही कारणास्तव मागे घेता येणार नाही व सोडतीपूर्वी अनामत रक्कम परत मिळणार नाही.
- विशेष सूचना - यशस्वी झालेल्या अर्जदारांनी अनामत रक्कमेचा परतावा पात्रता निश्चित करण्यापूर्वी/पात्र झाल्यानंतर तथापि देकारपत्र देणेपूर्वी/अपात्र झाल्यानंतर मागितल्यास अर्जासोबत भरलेल्या रक्कमेतून ₹१,000/- प्रशासकीय खर्च वजा करून उर्वरित रक्कम विना व्याज अर्जदाराने दिलेल्या बँकेच्या खात्यात परतावा करण्यात येईल.
- तात्पुरते देकार निर्गमित केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव सदनिका नाकारली किंवा वितरण रद्द करण्यात आल्यास सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १ टक्के एवढी रक्कम समपहरण (Forfeit) करण्यात येईल.
- **म्हाड (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१ मधील विनियम १३ (अ)** अन्वये अनुसूचित जाती आणि नवबौद्ध (SC), अनुसुचित जमाती (ST), भटक्या जमाती (NT), विमुक्त जाती (DT), या पैकी कोणत्याही प्रवर्गाकरीता उपलब्ध सदनिकांच्या संख्ये एवढे अर्ज प्राप्त न झाल्यास प्रवर्गनिहाय रिक्त राहणाऱ्या सदनिकांसाठी इतर ४ प्रवर्गातील अर्जदारांचे अर्ज या आरक्षणाखाली सोडतीत उच्चस्तरीय समितीच्या मान्यतेने विचारात घेतले जातील.
- **म्हाड (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१ मधील विनियम १३ (ब)** अन्वये संरक्षण दलातील किंवा सीमा सुरक्षा दलातील जे कर्मचारी लढाईत जखमी होऊन अपंग झालेले आहेत (DF) या प्रवर्गात उपलब्ध सदनिकांपेक्षा कमी अर्ज प्राप्त झाल्यास सदर सदनिकांचे आरक्षण माजी सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती (EX), या प्रवर्गातून सोडतीत उच्चस्तरीय समितीच्या मान्यतेने विचारात घेतले जातील.
- **म्हाड (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१ मधील विनियम १३ (क)** अनुसूचित जाती आणि नवबौद्ध (SC), अनुसुचित जमाती (ST), भटक्या जमाती (NT), विमुक्त जाती (DT), **हे प्रवर्ग वगळून उर्वरीत सर्व प्रवर्गासाठी** उपलब्ध असणाऱ्या सदनिकांच्या संख्ये एवढे अर्ज उपलब्ध न झाल्यास रिक्त राहणाऱ्या प्रवर्गातील सदनिका या सर्वसाधारण जनता (GP) या प्रवर्गातील अर्जदारांस सोडतीत उच्चस्तरीय समितीच्या मान्यतेने विचारात घेतले जातील.
- सदर योजनेतील वितरणांस महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण व सदनिकांची अदलाबदल) विनियम १९८१ व (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१ तरतूदी जशाच्या तशा (वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांसह) लागू राहतील.

## (अ) प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत अर्ज करणाऱ्या अर्जदारांच्या अटी व शर्ती

१) अर्जदार व अर्जदाराच्या कुटुंबाचे नावे भारतात कुठेही पक्के घर नसावे.

२) **अर्ज करण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत नोंदणी असणे अथवा करणे आवश्यक आहे.** प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घटक क्र. ३ मध्ये नोंदणी केलेली असल्यास नोंदणी क्रमांक अर्जात नमूद करणे आवश्यक आहे. तथापी नोंदणी नसल्यास सोडतीमध्ये यशस्वी झाल्यानंतर नोंदणी करणे बंधनकारक आहे.

३) प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या सदनिकांसाठी अर्जदार, कुटुंबामध्ये पती-पत्नी व अविवाहित मुले यांचा समावेश असेल तसेच सदनिकांसाठी कुटुंबातील कर्त्या महिलेच्या किंवा कुटुंबातील कर्ता पुरूष व महिला यांच्या संयुक्त नावे वितरण करण्यात येईल.

४) प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत पात्र लाभार्थ्यास केंद्र व राज्य शासनाचे मिळून एकूण ₹ **२.५0 लक्ष प्रति सदनिका** वितरणाच्या वेळी नियमानुसार प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घटक क्र. ३ मध्ये नोंदणी केलेली असल्यास अनुदानाचा लाभ मिळेल.

५) तसेच या पूर्वी विविध संस्थेकडून / शासनाकडून प्राप्त झालेल्या निवेदनकारांनी सदर प्रक्रियेमध्ये नियमानुसार अर्ज करणे आवश्यक राहील.

६) सदर योजना ही आगाऊ अंशदान असल्यामुळे पात्र लाभार्थ्यांनी मंडळाकडून देण्यात येणाऱ्या टप्प्यांमध्ये विक्री किंमतीचा भरणा करणे आवश्यक राहील.

## (ब) २0% सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेतील अर्जदारांसाठी विशेष सूचना

- जाहिरातीतील नमूद केलेली सदनिकेची किंमत निव्वळ बांधकामाची रक्कम असून सोडतीत यशस्वी व पात्र ठरलेल्या जाहीरातीमध्ये नमूद केलेल्या सदनिकांच्या रक्कमेव्यतिरीक्त जीएसटी, स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन चार्जेस, प्रॉपर्टी टॅक्स, एम.एस.ई.बी. चार्जेस, सोसायटी रजिस्ट्रेशन चार्जेस, सोसायटीच्या नावे जमिन हस्तांतरण चार्जेस इ. शासकीय / महानगरपालिकेकडील शुल्काचा भरणा तसेच रेरा कायद्यान्वये अनुज्ञेय असलेल्या पार्किंग व इतर बाबींच्या शुल्काचा भरणा करावा लागेल. तसेच दरम्यानच्या काळात शासनाकडून या संदर्भात काही निर्देश प्राप्त झाल्यास सदर निर्देशाच्या अनुषंगाने कारवाई करणे अर्जदारास व विकासकास बंधनकारक राहिल.
- सदर प्रकल्पामध्ये स्वमालकीचे कव्हर्ड पार्किंग हवे असल्यास (उपलब्धतेनुसार) विकासकाकडे संपर्क साधावा लागेल.
- २0% सर्वसमावेशक योजनेअंतर्गत सदनिकेची विक्री किंमतीमध्ये १0 टक्के रक्कम प्रशासकीय खर्च म्हणुन अंतर्भूत आहे. सदर १0 टक्के रक्कम तात्पूरत्या देकार पत्राच्या दिनांकापासून ४५ दिवसांत पात्र लाभार्थ्यांनी म्हाडाकडे भरणा करावी व उर्वरित रक्कमेचा भरणा विकासकाकडे तात्पूरत्या देकारपत्राच्या दिनांकापासून विनाव्याजी १0५ दिवसांत व तद्नंतर ११% व्याजासह पुढील ९0 दिवसांत करणे बंधनकारक राहिल. म्हणजे देकार पत्राच्या दिनांकापासून १९५ दिवसांत संपूर्ण रक्कमेचा भरणा करणे बंधनकारक असून उक्त मुदतीनंतर विकासकाच्या अहवालानुसार सदनिकेचे वितरण रद्द करुन प्रतिक्षा यादीवरील अर्जदारास संधी देण्यात येईल.
- संबंधित नियोजन प्राधिकरणाकडून भोगवटा प्रमाणपत्र (Occupation Certificate) प्राप्त झाल्यानंतर सदनिकेचा ताबा विकासकाकडून घेणे आवश्यक राहील.
- अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, भटक्या जमाती व विमुक्त जमातीच्या प्रवर्गातील अंतिमतः पात्र लाभार्थींना जातीचा दाखला व जात वैधता प्रमाणपत्र पात्रता सिद्ध करताना सादर करणे बंधनकारक आहे. जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी अहवाल विकासकाकडे सादर करणे बंधनकारक आहे.
- मंडळाकडून पात्र लाभार्थ्यांचे प्रशासकीय शुल्क भरणा केल्यानंतर अर्जदाराने पुढील संपूर्ण सदनिका वितरण संबधीचा पत्रव्यवहार जसे गृहकर्ज घेण्याकरिता **''ना हरकत प्रमाणपत्र''** व सदनिकेची उर्वरित रक्कम भरण्याकरिता मुदतवाढ मिळणे संबंधित विकासकाकडून परवानगी घेणे आवश्यक राहील.

## (क) कोंकण म्हाडा गृहनिर्माण योजना

१) अर्जदारास पात्रता निश्चितीनंतर तात्पुरते देकार पत्र देण्यात येईल. तद्नंतर अर्जदाराने सदनिकेच्या एकूण किंमतीच्या २५% रक्कम ४५ दिवसांत व उर्वरित ७५% रक्कम त्यापुढील ६0 दिवसांत भरणे बंधनकारक आहे. तद्नंतर ११% व्याजासह (प्राधिकरणाच्या प्रचलित पद्धतीनुसार) ९0 दिवसांपर्यंत मुदतवाढ देण्यात येईल. (तात्पुरत्या देकार पत्राच्या दिनांकापासून अर्जदाराने १९५ दिवसांपर्यंत संपूर्ण विक्री किंमतीचा भरणा करणे आवश्यक आहे. सदर रक्कम विहीत मुदतीत न भरल्यास पूर्वसुचना न देता सदनिकेचे वितरण रद्द करण्यात येईल).

२) संकेत क्र.११७ C, संकेत क्र. ११८ C, संकेत क्र. २५६ B, संकेत क्र. २६३ B, संकेत क्र. २६४ B, संकेत क्र. २६७ A, संकेत क्र. २६८ A, संकेत क्र. २६९ A, संकेत क्र. २७४ A, संकेत क्र. २७८ A, ह्या सदनिकांच्या बाबतीत बांधकाम पूर्ण झालेल्या सदनिका जशा आहेत तशा स्थितीमध्ये वितरीत करण्यात येत आहेत. विखुरलेल्या सदनिका असून ह्या सदनिकांबाबत कोणत्याही न्यायालयात दावा प्रलंबित असल्यास यापूर्वी वितरण/ ताबा झाला असल्यास पडताळणीअंती योग्य तो निर्णय घेण्यात येऊन सदरचा निर्णय अर्जदारास बंधनकारक राहिल. सदर प्रक्रियेदरम्यान कोणत्याही न्यायालयात दावा अर्जदारास दाखल करता येणार नाही तसेच भरणा केलेल्या रक्कमेवर व्याजाची मागणीसुध्दा करता येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी. अशा प्रकारची प्रकरणे निदर्शनास आल्यास/ आढळल्यास त्याचा निपटारा मंडळाच्या स्तरावर लवकरात लवकर करण्याची तजविज केली जाईल.

## यशस्वी अर्जदाराने खालील कागदपत्रे सादर करावयाची आहेत

- **१)** स्विकृती पत्र (नमुना-स) **२)** प्रमाणीत फोटो (नमुना-फ) **३)** अटी शर्ती दर्शविणारे ॲपेन्डिक्स (नमुना-एपी) **४)** प्रतिज्ञापत्र (नमुना-प्र) **५)** क्षतीपूर्ती बंधपत्र (नमुना-क्ष) **६)** १८ वर्षे पूर्ण वयाचा पुरावा **७)** महाराष्ट्रातील रहिवास/वास्तव्याचा दाखला (Domicile Certificate) **८)** अर्जदाराचे दिनांक 0१/0४/२0२0 ते ३१/0३/२0२१ या कालावधीत उत्पन्न सिद्ध करणारे पुरावे. **९)** अर्जदाराचे संबंधित महानगरपालिका / नगरपालिका / नगर परिषद / ग्रामपंचायत हद्दीत घर / भुखंड नसल्याचे शपथपत्र / प्रतिज्ञापत्र (नमुना ई) **१0)** अर्जदाराने या पूर्वी शासकीय गृहनिर्माण योजनेमध्ये राज्यात कुठेही घर किंवा भूखंडाचा शासकीय योजनेतील लाभ घेतलेला नसावा. (नमुना ई-२) **११)** सध्या राहत असलेल्या घराबाबतचे पुरावे **१२)** सर्व आरक्षित प्रवर्गातील अर्जदाराने संबंधित आरक्षित प्रवर्गाचे सक्षम प्राधिकाऱ्याचे जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र.
- उपरोक्त सर्व कागदपत्रांचा सविस्तर तपशिल **https://lottery.mhada.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या माहिती पुस्तिकेमध्ये देण्यात आला आहे.
- सर्व प्रतिज्ञापत्र/क्षतीपूर्तीबंधपत्र, स्वयंघोषणापत्र स्वरुपात साध्या कागदावर सादर करावयाची आहेत. त्यासाठी न्यायिक कागदाची (Stamp Paper) आवश्यकता नाही.
- जाहिरातीमध्ये अनावधानाने झालेल्या छपाईंच्या चुकांचा कोणत्याही प्रकारे अर्जदाराला फायदा घेता येणार नाही.
- या योजनांतर्गत झालेला कोणताही अर्ज किंवा सर्व अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचा किंवा संपूर्ण जाहिरात रद्द करण्याचा अधिकार मुख्य अधिकारी / कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी राखून ठेवला आहे.

**माहिती पुस्तिका व अर्जाचा नमुना दि. २४/0८/२0२१ रोजी दुपारी १२.00 वा. पासून संकेतस्थळावर उपलब्ध होईल कृपया त्याचा वापर करावा.**

**अधिक माहितीसाठी संपर्कः कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा लॉटरी मार्गदर्शन केंद्र, मित्र कार्यालय शेजारी, गेट नं. ३ जवळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४00 0५१.**

**म्हाडाचे ऑनलाईन अर्जाकरिता संकेतस्थळः https://www.mhada.gov.in • https://lottery.mhada.gov.in**
**• हेल्पलाईन नं.: 0२२-२६५९८९२३/२४, 0२२-२६५९२६९२/९३ • ई-मेलः kblottery@mhada.gov.in**

**(डॉ. नितिन महाजन)**
**मुख्य अधिकारी, कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई**

CPRO/A/344

Sai Advertisers : (H) 36 cms. x (W) 33 cms.